दिवाळी : नोव्हेंबर २०१५

सकाळ (खानदेश)

# शब्ददीप

## इनोव्हेशन




सकाळ माध्यम समूहाचे प्रकाशन

किंमत १०० रूपये



# कचऱ्यात हरवलेल्या चिमुकल्यांचा शोध घेणारा अद्वैत

मोठ्या शहरातील लोकांना त्यांचे घर, रस्ते स्वच्छच हवे असतात. मात्र, हे स्वच्छ कोण करतं याविषयी त्यांना फारसे घेणे-देणे नसते. त्यांना कचरापेटीत आकंठ बुडालेला एखादा छोटा मुलगा पाहून वाईट तर वाटते, पण कोण हे लोक? कसे जगत असतील? काय प्रश्न भेडसावत असतील त्यांना? असे प्रश्न मात्र अजिबात पडत नाहीत. परंतु जळगावमधील अद्वैत दंडवते या तरुणाला हे सर्व प्रश्न पडले आणि त्याची उत्तरे शोधण्याचा चंगच त्याने बांधला. नियोजनबद्धरीत्या सर्वेक्षण करून उभारलेल्या 'वर्धिष्णू- सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सोसायटी'मार्फत सुरू झाली कचरा वेचणाऱ्या मुलांची आगळीवेगळी शाळा. या शाळेसह अद्वैतच्या कर्तृत्वाविषयी...

**मनीषा मोहोड**, जळगाव

कचरा वेचणाऱ्या मुलांमधील अशिक्षितता, सतत अस्वच्छ वातावरणात राहण्याने निर्माण होणारे आरोग्याचे गंभीर प्रश्न. अपुरा पैसा आणि व्यसने यामुळे दैनंदिन जीवनात त्यांना असंख्य समस्यांना तोंड द्यावे लागते. याची जाणीव ज्या क्षणी अद्वैतला झाली तेव्हा त्याने या मुलांना यातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. २०१४ मध्ये त्याने यासाठी काम करण्यास सुरवात केली. हातावर पोट असणाऱ्या असंघटित कामगारांच्या मुलांना कचऱ्यातून बाहेर काढत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. कचरा वेचणाऱ्या मुलांना शाळेत दाखल करणे कठीण असल्याचे लक्षात आल्यावर शाळाच त्यांच्यापर्यंत घेऊन जाण्याचा नावीन्यपूर्ण प्रयोग अवघ्या वर्षभरातच त्याने साकारला.

कचरा वेचणाऱ्या मुलांची सायंशाळा सुरू करताना आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांमध्ये शिक्षणाबद्दल कमालीची अनास्था दिसून आल्याने अद्वैत दंडवते यांनी पत्नी प्रणाली, मित्र सुशील व महेश जोशी यांच्या सहाय्याने 'वर्धिष्णू-सोशल रिसर्च ॲण्ड सोसायटी'ची स्थापना केली.

## सर्वेक्षण केले

सोसायटीमार्फत केलेल्या सर्वेक्षणात जळगावमधील तांबापुरा, भिलाटी, मटन मार्केट, दूध फेडरेशन या भागांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे आढळले. परिसरातील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी, जळगाव शहरातील तांबापुरा वस्तीतील भिलाटी भागात कचरा वेचणाऱ्या मुलांसाठी या संस्थेमार्फत गेल्या वर्षभरापूर्वी शाळा सुरू करण्यात आली. परिसरातील मरिमाता मंदिरात दररोज सायंकाळी ही शाळा भरते. मंदिराची घंटा हीच शाळेचीही घंटा आहे. या शाळेत सात ते सोळा वयोगटातील ७० मुले-मुली रोज सायंकाळी पाच ते सात या वेळेत शिकायला येत आहेत. दिवसभर ही मुले कचरा गोळा करून सायंकाळी शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. या मुलांमध्ये दर आठवड्याला नवीन मुलांची भर पडत आहे.

## आरोग्याचे प्रश्न

शाळेत कोणताही शिक्षक उभे राहून शिकवत नाही, तर या मुलांतच बसून त्यांच्याशी गप्पा मारत गोष्टी शिकविल्या जातात. मराठी बाराखडीतील शिकविलेले शब्द गोष्टीत शोधण्याचा प्रयोग शिक्षकांनी केल्यामुळे ज्यांना पूर्वी काहीच वाचता येत नव्हते, अशी मुले आता वाचायला लागली. कचरा वेचणारी मुले सतत घाणीत राहिल्याने वारंवार आजारी पडून आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे शाळेत आलेल्या मुलांना रोज स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जाते. शिक्षणामुळे या मुलांमध्ये नवीन आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

## कामाची दखलही

दरम्यान, एकीकडे शासन शिक्षणावर कोट्यवधी रुपये खर्च करते. शिक्षणाच्या विविध योजना आणल्या जातात. मात्र, समाजातील उपेक्षित घटक असलेल्या या मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. वर्धिष्णू-सोशल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट सोसायटीमार्फत अद्वैतने साकारलेला प्रयोग निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन अद्वैतला बुलडाणा येथील हिवरा आश्रमातर्फे सेवा समर्पण पुरस्कार देण्यात आला. तसेच सामाजिक कृतज्ञता निधीअंतर्गत सामाजिक कार्य करण्यासाठी मासिक मानधनही देण्यात आले. याचबरोबर जनार्थ संस्थेमार्फत 'शिक्षण' या विषयावर काम करणाऱ्यांना देण्यात येणारे मानधनही अद्वैत यांना नियमित सुरू करण्यात आले आहे.



जळगावमध्ये कचरा वेचणाऱ्यांसमवेत काम करताना त्यांना आत्मसन्मानाने आणि स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी प्रयत्न करत आहोत. आमच्या उद्दिष्टांबाबत आता स्पष्टता येत आहे. अनेक लोकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही एक-एक पाऊल टाकत आहोत. स्पर्धा, पैसा आणि सत्ता यांच्या पलीकडे सामाजिक बांधिलकी असलेले अर्थपूर्ण आयुष्य जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोत. पुढील काळात संघटनेच्या माध्यमातून कागदी व कापडी पिशव्या तयार करणे, कागदाच्या लगद्यापासून वह्या तयार करणे ही कामे लवकर सुरू होतील.

**– अद्वैत दंडवते**, जळगाव

* *